| दिनांक 15/03/2025 |
|---|
| 1 पाली पोलीस हद्दीत दिनांक 13/03/2025 रोजी 20:30 वा च्या सुमारास मौजे दर्यागाव पोस्ट पाश्चापुर येथे आरोपीत यांचे घरातीचे समोरील सार्वजनिक रस्त्यावर महिला फिर्यादी यांचे पती हे आरोपी यांस त्याचे वडीलाचं नावे आलेले घरकुल तुम्ही दुस-याला कसे दिलेत असे विचारले असता त्या गोष्टीचा आरोपी याने मनात राग धरुन त्याचे हातात असलेल्या शिगेने फिर्यादी यांचे पतीचे डोक्यात व पाठीत झोडी घालुन दुखापत केली.<br>याबाबत पाली पोलीस ठाणे गुरनं.25/2025, 118(1) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/सुनील गायकवाड हे करीत आहेत. |
| 2. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 14/03/2025 रोजी 01:30 वा च्या सुमारास मौजे अलायना सीटी प्लाझाच्या मेन गेट समोर शिळफाटा खोपोली, ता.खालापुर येथे फिर्यादी रा.हाळ खुर्द ता. खालापुर सध्या रा. बी/404 अलायना सीटी प्लाझा. शिळफाटा खोपोली, ता. खालापुर हे त्याच्या मौजे हाळ, ता.खालापूर येथील मुळ घरातून काम संपवून शिळफाटा-खोपोली येथील अलायना सिटी प्लाझा या बिल्डींगधील राहत्या घरी येण्यासाठी 01:30 वा. च्या सुमारास बिल्डींगच्या आतमध्ये जाणा-या रस्त्यावर आले वेळी आरोपीत इसम नं.01, रा. यशवंतनगर, शिळफाटा-खोपोली हा त्याच्यासोबत 10 ते 15 साथीदारांचा जमाव घेऊन येऊन त्याच्या कारला घेरले आणि त्याच्या कारमध्ये गोमांस असल्याची खोटी कारणे सांगून कार चेक करायची असल्याने त्यांना खाली उतरण्यास जबरदस्ती करीत असतांना त्यांनी त्यास नकार दिला म्हणून आरोपीत याने त्याच्या साथीदारांसह त्याच्यावर आणि त्याच्या कार वर हल्ला चढवून दगडफेक करुन त्यांना शिवीगाळी करुन धमकी दिली व त्यापैकी काही दगड त्यांना लागल्याने त्यांच्या उजव्या पायाच्या नडगीवर, पोटाच्या डाव्या बाजूच्या कुशीवर व हातावर मार लागून जखमा झाल्या आणि त्यांच्या फॉर्च्यूनर कारवर स्क्रॅचेस पडून कारचे नुकसान केले, तसेच आरोपीत नं.01 व त्याच्यासोबतचा निळा व लाल रंगाचा टी शर्ट घातलेला इसम अशा दोघांनी ते राहत असलेल्या बिल्डींगच्या आवारात अनाधिकाराने प्रवेश करुन त्याना शिवीगाळी करुन धमकी दिली.<br>याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.79/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 189(1),189(2),189(3),189(4),191(1),191 (2),191(3), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.मनोज ठाकरे हे करीत आहेत. |

3. नेरळ पोलीस ठाणे हद्दीत 14/03/2025 रोजी 03:20 वा च्या सुमारास मौजे वारे गावचे हददीत शिवमंदिरा जवळ असलेल्या मैदानावर ता.कर्जत फिर्यादी रा.खैरपाडा, ता.कर्जत आणि आरोपीत रा.वारे ता.कर्जत यांच्यात दि.13/03/2025 रोजी क्रिकेटचा सामना चालू असतांना वाद झाले होते सदरचा वाद हा गावातील ग्रामस्थंनी मिटवला होता. दि.14/03/2025 रोजी आरोपीत यांनी दि.13/03/2025 रोजी झालेल्या वादाचा राग मनात धरून फिर्यादी यांचे उजव्या हाताच्या दंडावर कोयत्याचा वार करून इच्छापुर्वक दुखापत केली.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं.43/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/महेश गोरे हे करीत आहेत.

4. कोलाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 14/03/2025 रोजी 08:30 वा च्या सुमारास मौजे मुंबई गोवा हायवे रोडवर सुंकेळी खिंड येथील रोडवर, रोहा येथे महिला फिर्यादी रा. शिव रेसीडन्सी कात्रत रोड बेलापुर इस्ट रूम नंबर 302 ए विंग , बदलापुर, ठाणे यांचे पती हे त्यांचे ताब्यातील सुझुकी कंपनीची स्कुटी क्र एम एच 04 एम सी 4521 ही स्वता चालवित त्यागाडीचे पाठीमागे फिर्यादी ही बसुन बदलापुर ते मुंबई गोवा हायवे रोडने होळी सणाकरीता गावी पोलादपुर येथे जात असतांना मौजे सुकेळी खिंड येथे आले वेळी यांतील फिर्यादी यांचे पती यांचा गाडीवरील ताबा सुटला व गाडी उजवे बाजुला स्लिप होवुन रोडवर खाली पडली असता त्यादरम्यान पाठीमागुन अज्ञात वाहनावरील चालक याने त्याचे ताब्यातील गाडी अती वेगात चालवुन रोडचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून रोडवर खाली पडलेले फिर्यादी यांचे पतीचे अंगावरून गाडी नेवुन त्या अपघातात फिर्यादीचे पतीला डोक्याला गंभीर दुखापत होवुन त्या दुखापतीत ते मयत झाले आहेत तसेच फिर्यादी हिला देखील लहान मोठया दुखापतीस तसेच गाडीचे नुकसानीस कारणीभुत होवुन अज्ञात वाहन चालक याने पोलीस ठाणेत तक्रार न देता पळुन गेला.

याबाबत कोलाड पोलीस ठाणे गुरनं.26/2025, भारतीय न्याय संहिता 2023 मो वा का कलम 106(1), 281,125(A),125(B) 184, 134 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.सुर्यकांत भोजकर हे करीत आहेत.

5. पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/03/2025 रोजी 18:00 वा ते दि.13/03/2025 रोजी 18:00 वा वाजताच्या दरम्यान वाकणवाडी स्टॉप येथे फिर्यादी यांचे शेतघराच्या समोर उघडया लागेवरील तार कम्पाउंड मधुन, सुधागड येथे अज्ञात आरोपीत याने फिर्यादी यांचे मालकीचे एकुण 02 म्हैस व 01 गाय फिर्यादी यांचे शेतघराच्या समोर उघडया जागेवरील तारकम्पाउंडर फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या ईरादयाने स्वतःचे फायदया करीता चोरून नेले.

याबाबत पाली पोलीस ठाणे गुरनं.26/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/ढुमणे हे करीत आहेत.

6. म्हसळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 14/03/2025 रोजी 15:00 वा च्या सुमारास मौजे साळविंडे ताडाचीवाडी येथे फिर्यादी यांचे घरासमोर, ता.म्हसळा येथे आरोपीत क्र.01 हा त्याचे

मित्र आरोपीत क्र.02 ते 05 सर्व रा.साळविंडे ताडाचीवाडी ता.म्हसळा जि.रायगड यांचेसोबत फिर्यादी यांचे घराजवळ येउन त्यांचे घराचे भिंतीवर लघवी करत होता. तेव्हा फिर्यादी यांचे वडील यांनी त्यास लघवी करू नको असा जाब विचारला असता त्याचा राग मनात धरून गैरकायदयाची मंडळी जमवुन आरोपीत यांनी सर्वानी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळी करून जीवे ठार मारण्याची धमकी देउन हाताबुक्क्याने, लाकडी दांडक्याने मारहाण करून जखमी केले आहे व मा.जिल्हाधिकारी यांचे महा.पोलीस कायदा 1951 चे कलम 37 एक, तीन हे लागु असताना सुध्दा त्याचे उल्लंघन केले. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 15/03/2025 रोजी 01:15 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत म्हसळा पोलीस ठाणे गुरनं.17/2025, मुंबई पोलीस अधिनियम, 1951 चे कलम 135, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1),189(2),191(2),191(3),190,352,351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.रोहीणकर हे करीत आहेत.

7. अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/03/2025 रोजी 22:10 वा च्या सुमारास मौजे वाडगाव फाटा ता.अलिबाग येथे 05 सर्व रा.वडगाव ता.अलिबाग आरोपीत यांनी जमिनीच्या वादातुन मनात राग धरून गर्दी करून फिर्यादी व त्यांचे पत्नीला शिविगाळी करून हाताबुक्क्यांनी मारहाण केली. आरोपीत क्र.01 यांनी हातात पाहार आणुन फिर्यादी व त्यांचे पत्नीला मारहाण केली.आरोपीत क्र.02 यांनी त्यांचे पाळीव कुत्र्यास छु असे म्हणुन फिर्यादी यांचे अंगावर सोडल्याने तो कुत्रा फिर्यादी यांचे उजव्या हाताच्या मधल्या बोटाला चावला आहे. सर्व आरोपीत यांनी केलेल्या धक्काबुक्कीत फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चैन तुटुन कोठेतरी पडुन गहाळ होवुन नुकसान केले.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.47/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे 189(3), 190, 191(2),118(1),115(2),352,351(2)(3),324( प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.मुंजाबा सौंदरमल हे करीत आहेत.

8. पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 06/03/2025 रोजी 16:30 वा च्या सुमारास मौजे पाली विळे रोडवरील अडुळसे गावचे हददीतील नेव्ही कॉलेज समोर , सुधागड येथे आरोपीत हा त्याचे ताब्यातील क्रीटा कार क्र एम एच 05 एफपी 8970 ही दापोली ते बदलापुर अशी स्वत चालवित घेवुन निजामपुर पाली रोड मार्गे प्रवास करीत असताना सदरची कार ही 16.30 वा चे सुमारास मौजे अडुळसे गावचे हददीतील नेव्ही कॉलेज जवळ आले वेळेस सदर कारवरील चालक याने त्याचे ताब्यातील क्रीटा सोनेट कार क्र एम एच 05 एफपी 8970 ही रस्त्याचे परिस्थतीकडे दुर्लक्ष करुन ती अतिवेगाने चालवुन त्याचा गाडीवरील नियत्रण सुटल्याने गाडी रस्त्याचे साईड पटटीवरुन घसरुन रोडलगत असलेल्या झाडाला ठोकर मारुन पलटी होवुन अपघात झाला असुन अपघातात स्वत:चे व गाडीमधील इतर प्रवासी यांचे किरकोळ व गंभीर दुखापतीस तसेच आरोपीत याची पत्नी नेहा रणदिवे हिचे मृत्युस व गाडीचे दुखापतीस कारणीभुत झाला.

याबाबत पाली पोलीस ठाणे गुरनं.27/2025 भा.दं.वि.क.281,106(1), 125(a), 125(b)

, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/कांबळे हे करीत आहेत.

9. माथेरान पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/03/2025 रोजी 23:30 वा च्या सुमारास मौजे रेल्वे ऑफीसर रेस्ट हाउस माथेरान ता.कर्जत येथे आरोपीत नं.02 याने मयत याचा मोबाईल घेतला होता तो मोबाईल मयत मागत असल्याने तो मोबाईल आरोपीत याने परत न दिल्याने त्यांच्यात वाद होउन मयत याने शिवीगाळी करून आरोपीत याचे कानाखाली मारले म्हणुन आरोपीत नं.01 याने मयत यास तु शिवीगाळी करू नको असे बोलला असता मयत आरोपीत नं.01 याचे नाकातोंडावर फायटी मारून दुखापत केली या गोष्टीचा आरोपीत आरोपी नं.01 व 02 यांनी मनात राग धरून संगनमत करून मयत यास शिवीगाळी व हाताबुक्यांनी मारहाण करून कोणत्यातरी धारदार हत्याराने मयत सुशांत सुनिल गेजगे याचे पोटावरती व छातीवर वार करून जिवे ठार मारले आहे.

याबाबत माथेरान पोलीस ठाणे गुरनं.02/2025,भा.न्या.सं.कलम 2023 चे कलम 103(1), 352 ,115(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.अनिल सोनोने हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 14.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 216 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,25,000/-रुपये इतका दंड आकारला आहे.